International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# शिख धर्म गुरुग्रंथसाहिबातील मराठी संत नामदेव

डॉ. रमाकांत शिवाजीराव शातलवार

## प्रस्तावना

शिख धर्माच्या इतिहासाची सुरुवात भारतीय उपखंडातील पंजाब भागात १५ व्या शतकात होऊन गेलेले शिख धर्माचे पहिले गुरु नानक देवजी याच्या पासुन होते. धर्माचे रितीरिवाज स्पष्ट पणे आखणी १३ एप्रिल १६९९ गुरु गोविंदसिंगाने केली गुरु गोविंदसिंगानी खालसा पंथाची स्थापना करुन शिख समाजाला अन्याय विरुद्ध लढाऊ बनविले. त्यामुळे शिख धर्माच्या लोकात एक नवीन शक्ति निर्माण केली. गुरुच्या विचारामुळे व खालसाच्या निर्मितीमुळे तळगाळातला लोकाचे आश्चर्यकारक उद्यापन झाले. प्रत्येक धर्माचा स्वत:चा ग्रंथ असतो. शिख धर्माचा असा एक धर्म ग्रंथ आहे. तो त्यांचा मुळग्रंथ असल्याने 'आदिग्रंथ' या नावाने संबोधिला जातो. शिख धर्मात गुरु नानक देवजी पासुन गुरु परंपरा सुरु झाली होती. ते दहावे गुरु गुरु गोविंदसिंग पर्यत असे गुरु परंपरा होती. प्रा. मदन मार्डीकर म्हणतात,'शिखांचे दहावे व अंतिम गुरु गोविंदसिंग यांनी त्यांच्या शिष्यांना सांगितले की, त्याच्यानंतर कुणीही मानवदेहधारी त्याचा गुरु असणार नाही. त्यामुळे त्यांनी यापुढे आदिग्रथांलाच गुरु मानुन त्या प्रति श्रद्धाभाव बाळगावा'. ग्रंथ हाच गुरु झाल्याने गुरु गोविंदसिंगच्या काळानंतर हा ग्रंथ गुरुग्रंथसाहेब या नावाने ही सबोधला जाऊ लागला.'[१]

## विषय निवडणेचा हेतु

प्रस्तुत विषय निवडणेचा हेतु म्हणजे शिख धर्म पंथाच्या उद्याच्या पार्श्वभुमित संत नामदेवांनी रुजविलेले तत्वज्ञान अभ्यास करणे.

## गृहितके

१) शिख धर्म ग्रंथ गुरुग्रंथसाहेबातील मराठी संताचे योगदान अभ्यास करणे.

२) शिख संप्रदाय मराठी संताचे आध्यात्मिक श्रेष्ठत्व मान्य करतो.

## संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधनात शिख धर्म गुरुग्रंथसाहेबातील मराठी संत नामदेव योगदान या शोधनिबंधात प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. शिख धर्म ग्रंथ गुरुग्रंथसाहेबातील मराठी संत नामदेव यांचे योगदान

## गुरुग्रंथसाहेबाचा प्रारंभ .

डॉ. सोमनाथ रोडे यांच्यामते 'शिख धर्माचे विद्धान डॉ. तारन सिंहजी यांनी गुरु ग्रंथ रत्नावली मध्ये स्पष्ट केले की, श्री गुरु ग्रंथसाहेब या ग्रंथाचे संकलन अम्रतसर येथे रामसरच्या रमणीय तटावर श्री गुरु अजुर्नदेव यांनी इ. स.१६०१ मध्ये सुरु केले. इ. स. १६०४ मध्ये तीन वर्षाच्या पुर्ण परिश्रमानंतर हे अमोल कार्य पुर्ण झाले.'[२] शिख गुरुंचे अधिकृत लिखाण आणि शिकवण शिख पंथाच्या शिष्यापुढे ठेवणे ही गुरु अर्जुन देव याची तळमळ होती. शिखांचा धार्मिक ग्रंथ एवढेच या ग्रंथाचे मोल तर आहे. त्या बरोबर भारतीय इतिहासाचा एक मौलिक ठेवा आहे. गुरु ग्रंथसाहेब ही गुरु अर्जुन देव यांच्या पुर्वी होऊन गेलेल्या गुरु अंगद आणि गुरु अमरदास यांच्या रचना व शिकवणच गोळा केली गुरुग्रंथसाहेबाची रचना करताना भक्ति चळवळीतील हिंदु व मुसलमान प्रमुखांकडे विचारणा करुन त्यांच्या त्यांच्या पंथातील उत्तम रचना पाठविण्याची विनंती केली.

## गुरुग्रंथसाहेबाची रचना

डॉ. जयराम मिश्र या ग्रंथाची भुमिका स्पष्ट करताना म्हणतात की, श्री गुरुग्रंथसाहेब हा १४३० पुष्ठाचा महाकाय ग्रंथ आहे. यांचे संकलन प्रथम गुरु अर्जुन देवांने केले. त्याय अर्ध्याच्यावर वाणीचा समावेश आहे. या शिवाय त्यांच्या पुर्वगामी गुरुवाणीचाही समावेश आहे. '[३] 'या ग्रंथात जानकांचे ९७६, ईशस्त्रोत, गुरु अंगद ६१ ईशस्त्रोत, ९०७ गुरु अमरदासाचे ईशस्त्रोत,६७९ गुरु रामदासाचे ईशस्त्रोत आणि ११८ गुरु तेजबहादुरचे ईशस्त्रोत आहे.'[४] 'इस दौरान उन्होने गुरुग्रंथसाहेब का संपादन किया जो मानवजाति को सबसे बडी देन है। संपुर्ण मानवता में धार्मिक सौहार्द पैदा करने के लिए अपने पुर्वपुव पुर्ववती गुरुओ की वाणी को जगह-जगह से एकत्र कर असे धार्मिक ग्रंथ में बांटकर परिष्कृत किया गुरुजी ने स्वय: की उच्चारित ३० रागों में २२१८ शब्दों को भी गुरु ग्रंथसाहेब में दर्ज किया है।'[५] अशी एकुण पहिल्या पाच गुरुची ४८३९ पद्धे आहे. तसेच शिख धर्म शिवाच इतर धर्मीयाच्या जवळपास ९३७ ईशस्त्रोत या पवित्र ग्रंथात समावेश आहे. या ग्रंथाचा आणखी एक विशेष अर्जुनदेवांच्या सहिष्णु,

उदार सर्वसमन्वयक, अशा धर्मदृष्टीचा प्रत्यय देणारा आहे आपल्या गुरुंच्या अस्सल पदांबरोबर बाबा फरिद, कबीर, जयदेव, रैदास आणि महाराष्ट्र संत नामदेव यांच्याही पदाचा समावेश ग्रंथसाहेब समाविष्ट आहेत.

**गुरुग्रंथसाहेबाची भाषा**

प्रा. मदन मार्डीकर याच्या मते, 'आदिग्रंथात ज्या रचनाचा समावेश आहे. करण्यात आला त्यापैकी बहुतेक रचना पंधराव्या आणि सोळाव्या शतकातील पंजाबी, भाषेत, परंतु पुष्कळ भक्तांच्या रचनांमध्ये त्यांच्या त्यांच्या भाषेत उदा. हिंदी पर्शियन, गुजराती, मराठी आणि संस्कृत शब्दाचा मुबलक वापर आढळुन येतो. ग्रंथाची भाषा जरी पंजाबी असली तरी लिपी गुरुमुखी आहे. तर संत नामदेव व त्रिलोचन या महाराष्ट्रातील संतांच्या रचनांमधुन मराठी भाषेचा प्रभाव जाणवतो.'[६]

**संत नामदेव यांचे योगदान**

' संत नामदेव यांनी आयुष्याची शेवटची २० वर्ष पंजाब मध्ये होते गुरु नानकदेवांनी शिख धर्माची स्थापना करण्याआधी सुमारे २०० वर्ष त्यांनी पंजाबी समाजात समतेचे, मानवतेचे, अंकुर फुलवले म्हणुन पवित्र गुरुग्रंथसाहेबात संत नामदेवाची ६१ पदे आहे. शिख धर्मात दहा गुरु प्रमाणेच प्रात: स्मरणीय असणाऱ्या १५ भगतांमध्ये संत नामदेवाना 'भगत शिरोमणी ' म्हणुन ओळखले जाते.'[७] 'गुरुग्रंथसाहेब में भिन्न-भिन्न जाति एवं धर्मा के १५ सन्तो की वाणी को स्थान दिया गया है जिसमे भक्त रविदास, चर्मकार थे, कबीर जुलाहा थे, नामदेव छिंपी ये और फरीद मुसलमान ये इन भक्तो की वाणी को भी उतने आदर के साथ पढा जाता है जितना गुरुओ की वाणी को जिसका। सीधा-सीधा अर्थ यह निकलता है कि ग्रंथ में धर्म-जाती आदि को महत्व देते हुऐ उच्च बौद्धिक विचारों का महत्व दिया गया है।'[८] 'गुरु नानकांनी आपल्या 'जपजी' मधील मुलमंत्रात सांगितली आहेत.

इक ओंकार, सलाम, कर्तापुरख,
निर्मल, निवैर, अकाल मुरत
अज‌ुनि- से – भंग गुरप्रशाद

गुरु नानकांचा हा 'मुलमंतर' म्हणजे नामदेवांच्या शिकवणुकीचा वेगळया भाषेतील जवळजवळ अनुवादच आहे. गुरु नानकांच्या शिकवणीत आणि 'आदिग्रंथा' त ईश्वराचे नाव आणि त्यांचे स्मरण यांना जे अग्रण्य स्थान आहे. याचा उगम प्रामुख्याने नामदेवापासुन घेतलेल्या प्रेरणेत असावा असा अंदाज करिता येतो.'[९] संत नामदेव महाराज हे विश्वव्यापकच आहेत त्यांनी अखिल मानवतेचा विचार करुन कार्य आणि लेखन केले. त्यांनी भारतभर केलेला प्रवास लोकजागृती आणि सामाजिक कार्यामुळे ते शिरोमणी ठरतात संत नामदेव यांनी भक्तीचा मार्ग हा नामस्मरण सांगितला नाम स्मरण हे मर्म होय. 'नाम' हा हे वारकऱ्यांच्या भक्तिचा गाभा आहे हे त्यांचे तत्व शिखाच्या ग्रंथसाहिबात समाविष्ट झाली आहेत.

**निष्कर्ष**

मध्ययुगीन भारताच्या मध्यवर्ती कालखंडातील सामाजिक आर्थिक, धार्मिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवन जाणुन घेण्याच्या दृष्टीने हा ग्रंथ अत्यंत उपयोगी आहे. आदिग्रंथाचे संकलन ही शिखांच्या इतिहासातील अत्यंत महत्वाची घटना आहे. संत नामदेव गुरु ग्रंथसाहिब मधील जे आहे सुगंध जसा आजुबाजुचे वातावरण सुवासिक करतो त्याच प्रमाणे त्याच्या भव्य आणि पवित्र आगमनाने साऱ्या चित्तप्रवृती प्रफुल्लित होतात. संत नामदेव यांची साधुभाषेतील पक्षत मराठी आणि आजची पंजाबी यांचा मधुर मेळ जमुन गेला आहे त्याच्या मराठी पदांत जशी गीतगुणपरता आहे तशी आदिग्रंथातील पदांतही आहे ही पदे निरनिराळया रागदारीत बसविली आहे. गुरु ग्रंथसाहिब हा ग्रंथ कोणता एक देश जाती, संप्रदाय यांच्यापुरता मर्यादित नसुन संपुर्ण मानवजातीसाठी असणारा द्विव्य संदेश आहे.

**संदर्भ**

1.प्रा. मदन मार्डीकर (२०००) शिखांचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पु. ११७

2.डॉ. सोमनाथ रोडे (१९९९) शिखांचा इतिहास, विद्याभारती प्रकाशन, लातुर, पु. १६०

3.कित्ता, पु. १६०

4.कित्ता, पु. १६०

5.webdunia.com

6.प्रा. मदन मार्डीकर (२०००) शिखांचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पु. ११९

7.महाराष्ट्र टाइम्स १ जुलै २०१४

8.शब्द ब्रह्म, Vol-2, Issue 4, 17 फरवरी 2004 पु. ६१

9.माधव गोपाळ देशमुख (१९७०) भारतीय साहित्याचे निर्माते नामदेव, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली. पु. १९